पृ.क.विकाअ/आस्था/२०१६/3221
दिनांक - 7 OCT 2016

प्रति,

प्राचार्य,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती
प्राचार्य,शासकीय औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय,अमरावती
प्राचार्य,शासकीय निवासी महिला तंत्र निकेतन,यवतमाळ
प्राचार्य,शासकीय तंत्र निकेतन,अमरावती /खामगांव/वाशीम/यवतमाळ/मुर्तीजापूर,

दिनांक १५.१०.२०१६ हा 'वाचन प्रेरणा दिन' म्हणुन साजरा करण्याचे घोषित केले. त्यानुसार कार्यवाही करुन कार्यवाहीचा अहवाल आणि छायाचित्रे या कार्यालयात सादर करण्यात यावी.

सहपत्र :- वरील प्रमाणे

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रतः- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण वि.का.अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.

Gmail roamravati amravati <roamravati.dte@gmail.com>

# Fwd: वाचन प्रेरणा दिन दिमाखात आणि गांभीर्यासह साजरा करण्याबाबतचे मा.ना.श्री. विनोद तावडे यांचे पत्र.

1 message

**मा. ना. श्री. विनोद तावडे** <vinodtawdeminister@gmail.com> Thu, Sep 29, 2016 at 1:17 PM
To: teachereducation@rediffmail.com, jdheamt@yahoo.com, Ajay Sali <ajaybsali@gmail.com>, dr_smd@rediffmail.com, jtdirsol@rediffmail.com, Vireshwar Balkrishna Wamanrao Wamanrao Narayanrao <jdheaur_2007@rediffmail.com>, jdhe.nanded@yahoo.co.in, jdhengp@rediffmail.com, Joint Director Higher Education Pune Region <jdhepune@gmail.com>, jdhemumbai@yahoo.com, Rusa Maharashtra <spdrusamah@gmail.com>, sushilkumarbc@gmail.com, keshav.tupe@yahoo.in, dhepune@yahoo.co.in, sashikumarbc@gmail.com, jtdirhesol@rediffmail.com, roamravati amravati <roamravati.dte@gmail.com>, ronsk_nsk@sancharnet.in, ropune.dte@gmail.com, ro Techinical Education Regional office Nagpur <ronagpur.dte@gmail.com>, jdteabad_agd@sancharnet.in, Joint Director <romumbai.dte@gmail.com>
Cc: Shailendra Deolankar <skdeolankar@gmail.com>

नमस्कार.

गेल्या वर्षी आपण सर्वांनी वाचन प्रेरणा दिन उत्साहाने साजरा करून डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे सार्थ स्मरण केले. याही वर्षी आपल्याला वाचन प्रेरणा दिन दिमाखात आणि गांभीर्यासह साजरा करायचा आहे.

या मेलसोबत माझे पत्र आणि संभाव्य उपक्रम सूची पाठवत आहे. तसेच वाचन प्रेरणा दिनाचे बोधचिन्ह (लोगो) पाठवत आहे. आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांत व सर्व संस्थांमध्ये कार्यक्रम संपन्न होईल, याबाबतचे आदेश आपल्या स्तरावरून सर्व संबंधितांना द्यावेत. यथोचित कार्यक्रम / उपक्रम आयोजित करून अहवाल आणि छायाचित्रे मला पाठविण्याच्या सूचनाही देण्यात याव्यात.

आपणां सर्वांना वाचन प्रेरणा दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

**-श्री. विनोद श्रीधर तावडे**
**मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण,**
**मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य आणि अल्पसंख्याक विकास**
**महाराष्ट्र शासन**

**6 attachments**




**लोगो पोस्टर.jpg**
477K

जावक क्र. 6109 दिनांक 29/9/16

**वॉटस्अॅप लोगो.jpg**

विनोद तावडे

मंत्री

सत्यमेव जयते

शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण
उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण
मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : २८ सप्टेंबर, २०१६

सस्नेह नमस्कार!

भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना सार्थ आदरांजली अर्पण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने गेल्या वर्षीपासून (२०१५) डॉ. कलाम यांचा जन्मदिवस **(१५ ऑक्टोबर)** हा **'वाचन प्रेरणा दिन'** म्हणून साजरा करण्याचे घोषित केले. त्यानुसार गेल्या वर्षी पहिला वाचन प्रेरणा दिन संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने, अभूतपूर्व प्रतिसादासह आणि अत्यंत उत्तम पद्धतीने संपन्न झाला.

माळरानातील शाळेपासून ते शहरांतील वातानुकूलित खोल्यांत भरणाऱ्या शाळेपर्यंत आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थांपासून ते अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन महाविद्यालयांपर्यंत सर्वच स्तरांवर पहिला वाचन प्रेरणा दिन दिमाखात पार पडला. ग्रंथालये, साहित्यिक-सांस्कृतिक संस्था आणि खाजगी कार्यालये यांचाही सहभाग लक्षणीय होता. यामध्ये प्रसारमाध्यमांचीही भूमिका खूपच मोलाची ठरली.

वाचन प्रेरणा व संस्कृतीचा विकास ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. **याही वर्षी (२०१६) आपल्याला वाचन प्रेरणा दिन उत्साह आणि गांभीर्यासह साजरा करायचा आहे.** ज्ञानसंपन्न व माहितीसमृद्ध समाजाची घडण, व्यक्तिमत्त्व विकास, साहित्य विकास आणि भाषाविकास यांसाठी वाचन संस्कृतीचा विस्तार आणि विकास करणे अत्यावश्यक आहे. म्हणूनच वाचन प्रेरणा दिनासारखे उपक्रम योजणे गरजेचे आहे.

**सर्व माध्यमांच्या व सर्व मंडळांच्या (बोर्डांच्या) शाळा, सर्व प्रकारची महाविद्यालये, खाजगी-सार्वजनिक ग्रंथालये, साहित्यिक-सांस्कृतिक संस्था, प्रकाशक-लेखक-पुस्तक वितरक, वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या अशा सर्वच घटकांनी वाचन प्रेरणा दिनी कार्यक्रम-उपक्रम योजावेत, असे आवाहन मी शासनाच्या वतीने करीत आहे.** संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणूस आपल्याला भरघोस प्रतिसाद देईल, अशी मला खात्री आहे.



कार्यालयीन पत्ता : १०८, पहिला मजला, विस्तारित इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२